आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१५ जुलै २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- देशात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत ५० कोटी ७५ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पिकांची पेरणी
- नेपाळचे प्रधानमंत्री म्हणून के पी शर्मा ओली यांचा शपथविधी
- घाऊक किंमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात ३ पूर्णांक ३६ शतांश टक्क्यावर
- मुंबई शेअर बाजारात चढउतार / सेन्सेक्स ८० हजार ८६३ अंकांची उंची गाठल्यानंतर १४६ अंकांची वाढ नोंदवत ८० हजार ६६ अंकांवर बंद

  **आणि**
- महाराष्ट्रातल्या चारही विभागांमधे आठवडाभर कमी आधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

देशात यंदाच्या खरीप हंगामात आतापर्यंत ५० कोटी ७५ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर पिकांची पेरणी झाली आहे. केंद्रीय  कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार ६२ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर कडधान्य, तर १ कोटी ४० लाख हेक्टर क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली आहे. १ कोटी १५ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर भात लावणी झाली आहे. या तिन्ही प्रकारांमधल्या पिकांच्या पेरणीचं क्षेत्रं गेल्यावर्षीपेक्षा वाढलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातही समाधानकारक पाऊस झाल्यानं खरीपाच्या पेरणीला पोषक वातावरण तयार झालं आहे. त्यामुळे शेतात पेरण्यांना वेग आला असून अनेक ठिकाणी पेरणीची कामं उरकत आली आहेत.

नाशिक जिल्ह्यात ६ लाख हेक्टरपेक्षा जास्त खरीपाचं क्षेत्र असून यापैकी चार लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. येवला तालुक्यातली खरीपाची पेरणी पूर्ण असून इतर तालुक्यातही ८५ टक्के पेरण्या झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

पालघर जिल्ह्यात पावसाचं प्रमाण चांगलं असल्यामुळे भात पिकाच्या लागवडीसाठी अनुकूल वातावरण तयार झालं आहे. जिल्ह्यात पावसानं आज थोडी उघडीप दिल्यानं शेतकऱ्यांनी भात लागवडीला सुरुवात केली.

**<><><><><>**

देशात अन्नधान्य, विशेषतः भाज्या आणि उत्पादनांच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे घाऊक किंमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात ३ पूर्णांक ३६ शतांश टक्क्यांवर गेला आहे. यात सलग चौथ्या महिन्यात वाढ नोंदवण्यात आली. हा दर मे महिन्यात २ पूर्णांक ६१ शतांश टक्के इतका होता.

**<><><><><>**

नेपाळचे नवीन प्रधानमंत्री म्हणून के पी शर्मा ओली यांनी आज शपथ घेतली. नव्यानं तयार झालेल्या आघाडीतल्या चार पक्षांच्या २१ सदस्यांनीही त्यांच्यासोबत मंत्रिपदाची शपथ घेतली. राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी या सर्वांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी के पी शर्मा ओली यांचं अभिनंदन केलं आहे. भारत-नेपाळ मैत्री अधिक दृढ करण्यासाठी, तसंच उभयपक्षी लाभाचं सहकार्य

वाढवण्यासाठी त्यांच्यासोबत काम करण्याकरता आपण उत्सुक असल्याचं मोदी यांनी त्यांच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कोळसा खाण मंत्रालयाने आज कोळसा खाण विकास आणि उत्पादन कराराअंतर्गत तीन कोळसा खाणींचा लिलाव केला. मच्छकाटा, कुडनली लुब्री आणि सखीगोपाळ बी काकुडी या तीन कोळसा खाणींचा लिलाव करण्यात आला. एनएलसी इंडिया लिमिटेड, गुजरात मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड आणि तामिळनाडू जनरेशन अँड डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी या खाणींसाठी बोली जिंकली. या तिन्ही खाणींमधून होणारं वार्षिक उत्पन्न सुमारे ३ हजार कोटी रुपये असून खाणकाम सुरू झाल्यानंतर ४० हजारांहून अधिक रोजगार निर्मिती होण्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

काँग्रेस पक्षाच्या महिला सदस्यांनी देशातल्या ७० कोटी महिलांचा आवाज व्हायला हवं, असं आवाहन अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्ष अलका लांबा यांनी केलं आहे. अलका लांबा यांनी आज मुंबईत टिळक भवन इथं महिला प्रदेश काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत मार्गदर्शन केलं त्यावेळी त्या बोलत होत्या.

महाराष्ट्रात कल्याणमध्ये एका महिलेची सामुहिक बलात्कारानंतर हत्या केल्याच्या घटनेबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला.

लोकसभेत भाजपाचा विजयरथ महाराष्ट्रानं रोखला, हा डबल इंजिन सरकारला इशारा आहे, आता काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनीही संघटनेला

बळकट करण्यासाठी झोकून काम करावं, आणि विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून द्यावा असं त्या म्हणाल्या.

<><><><>

शेअर बाजारात आज चढउतार झाले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज सकाळी शुक्रवारच्या तुलनेत १६७ अंकांनी वर उघडला. दुपारपर्यंत बाजार चढे होते. त्यादरम्यान मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकानं एकदा ८० हजार ८६३ अंकांची नवी उंची गाठली होती. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४ हजार ६३५ उंचीवर पोचला होता. मात्र ही उंची शेवटपर्यंत टिकली नाही.

दिवसअखेर सेन्सेक्स १४६ अंकांची वाढ नोंदवत ८० हजार ६६५ अंकांवर बंद झाला. तर, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ८५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ५८७ अंकांवर बंद झाला.

<><><><>

यावर्षी जून २०२४ मध्ये देशाची व्यापारी माल आणि सेवांची मिळून एकूण निर्यात अंदाजे ६५ अब्ज ४७ कोटी अमेरिकी डॉलर्स इतकी होती, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या हे प्रमाण ५ पूर्णांक ४ टक्क्यानं जास्त असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. दुसऱ्या बाजुला जून २०२४ मध्ये देशाची एकूण आयात अंदाजे ७३ अब्ज ४७ कोटी अमेरिकी इतकी होती, आणि मागच्या वर्षीच्या याच कालावधीच्या हे प्रमाण ६ पूर्णांक २९ टक्क्यानं वाढलं आहे असं मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><>

भारतानं गेल्या ९ वर्षांत साध्य केलेली प्रगती, देशात उभारल्या गेलेल्या सार्वजनिक डिजीटल पायाभूत सोयी सुविधांमुळे शक्य झाली, अन्यथा यासाठी ५०

वर्षे लागली असती असं भारताचे जी - ट्वेंटी समुहातले शेरपा अमिताभ कांत यांनी म्हटलं आहे. भारताच्या जी - ट्वेंटी कृती दलाच्या वतीनं आज सार्वजनिक डिजीटल पायाभूत सोयी सुविधांबाबतचा अंतिम अहवाल प्रकाशित झाला, त्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात अमिताभ कांत बोलत होते.

या कृती दलाचे सहअध्यक्ष नंदन नीलेकणी हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. शाश्वत विकासाची ध्येय उद्दिष्टे गाठण्यासाठी सार्वजनिक डिजीटल पायाभूत सोयी सुविधा महत्वाच्या ठरणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यात तयार झालेला तणाव निवळण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन मंत्री छगन भुजबळ यांनी केलं आहे. त्यांनी आज मुंबईत शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतल्यानंतर भुबातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. आजच्या भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. येत्या दोन दिवसांत आपण या विषयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करू, तसंच राज्यातल्या प्रमुख नेत्यांशी चर्चा करून हा प्रश्न कसा सोडवता येईल ते पाहू, असं पवार यांनी म्हटल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नीट यूजी अर्थात, पदवीपूर्व वैद्यकीय प्रवेश पात्रता परीक्षा पेपर फुटीप्रकरणी राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं नव्यानं दाखल केलेल्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयानं आज संबंधित याचिकाकर्त्यांना नोटीस जारी केली. याप्रकरणी काही विद्यार्थ्यांच्या याचिका राजस्थान उच्च न्यायालयापुढे प्रलंबित आहेत. त्या सर्वोच्च न्यायालयाकडे वर्ग कराव्यात, असं राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या याचिकेत म्हटलं आहे.

त्यावर सर्वोच्च न्यायालयानं, ही नोटीस बजावली आहे. मात्र राजस्थान उच्च न्यायालयापुढच्या प्रलंबित कार्यवाहीला स्थगिती देणारा औपचारीक आदेश जारी करायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यात पोलीस आणि जिल्हा राखीव सुरक्षा रक्षकांच्या संयुक्त पथकानं १२ माओवाद्यांना अटक केली आहे. खून, खूनाचा प्रयत्न, स्फोट, दरोडे, अपहरण आणि पोलिस पथकावर गोळीबाराच्या गुन्ह्यांमधे या माओवाद्यांचा हात असल्याचा आरोप आहे. या १२ जणांपैकी ५ जणांवर मेटापाल जंगलातून, तर ७ जणांना तर्वेममधून अटक करण्यात आली. यातल्या तीन माओवाद्यांवर एकूण ४ लाख रुपयांचं बक्षिस जाहीर केलेलं होतं.

**<><><><><>**

संसदेत घुसखोरी प्रकरणी दिल्ली पोलिसांनी अमोल शिंदे याच्यासह मनोरंजन डी, ललित झा, महेश कुमावत, सागर शर्मा आणि नीलम आझाद या सर्व सहा आरोपींच्या विरोधात आरोपपत्र दाखल केलं आहे. या सर्व आरोपींना दोन ऑगस्ट रोजी न्यायालयात हजर करून सुनावणी होणार आहे. या सर्वांनी १३ डिसेंबर २०२३ रोजी संसदेत घुसखोरी केली, तसंच लोकसभेचं कामकाज चालू असतांना प्रेक्षकदीर्घेतून दालनात उतरत, धुराचे डबे फोडले होते.

**<><><><><>**

राज्यात हा आठवडाभर कमी आधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या चोवीस तासात राज्यातल्या सर्व विभागांमधे बहुतांश ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तरळक ठिकाणी अतिशय जोरदार, मध्य महाराष्ट्र आणि

विदर्भात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी अति जोरदार पाऊस पडला. मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

उद्याही राज्यातल्या चारही विभागांमधे बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

या काळात मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम ते जोरदार पाऊस पडेल, काही ठिकाणी अतिशय जोरदार पाऊस पडण्याची शक्यता कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**